समाचार
पान नं.५: मंगळवार दिनांक १६ मार्च २०१०

## 'स्टरलाईट'च्या सहकार्याने

# नगर-औरंगाबाद रोडवर 'ॲफ्रो'तर्फे वृक्ष लागवड

नगर - येथील ॲक्शन फॉर फूड प्रॉडक्शन (ॲफ्रो) या संस्थेतर्फे औरंगाबाद येथील स्टरलाईट टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्या आर्थिक सहकार्याने नगर शहरालगत औरंगाबादकडे जाणाऱ्या राज्य महामार्गाच्या दुतर्फा सुमारे १००० वृक्ष लागवडीचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

या प्रकल्पांतर्गत तीन वर्षांमध्ये वृक्ष लागवडीबरोबर त्यांच्या जीविताच्यादृष्टीने १०० टक्के नियोजन करण्यात आले आहे. सध्या सुमारे ६५० वृक्षांची लागवड करण्यात आली असून करंज, गुलमोहोर, काशिद, चिंच, आवळा इत्यादी वृक्षांचा त्यामध्ये समावेश आहे. त्यांच्या देखभालीसाठी स्थानिक शेतकऱ्यांची मदत घेण्यात येत आहे.

ॲफ्रो संस्थेतर्फे करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीची स्टरलाईट टेक्नॉलॉजी तर्फे सर्वश्री शशिकांत शर्मा, अमित भालेराव, सुदीपता भौमिक, शामलिंग पी.केशवन, मेहेर गाडेकर आदींनी नुकतीच पाहणी करून कामाविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी ॲफ्रो संस्थेचे सर्वश्री डी.के.मनवलन, एस.सी.जैन, संग्राम साळुंके व इतर पदाधिकारी उपस्थित होते.